# हरदास लक्ष्मणराव नगराळे ( BABU )

## 6th Jan 1904 to 1939



- Pioneer of practice of exchanging the greeting of "Jai Bhim "
- Ardent follower of Dr B R Ambedkar
- General secretary of Independent labor party
- Founder of MAHAR SAMAJ ORGANISATION
- Founder of MAHAR SAMAJ PATHAK
- Mahila Ashram
- Night School
- Strongest opponent of Irrational and superstitious custom in society
- Strongly opposed sub-cast barrier
- A strong advocate to education to dalits

- Prolific writer for Social awareness in DC
- “Mandal Mahatme” in 1924- awareness amongst the people against the evils in society.
- Veer Balak ( Brave Child ) – Created new wave of awareness
- Articles in Janta – later edited by Dr B R Ambedkar
- 1928- First time meet with Dr BR Ambedkar
- Witness in front of Simon Commission.
- Sent a telegram to Ramsay MacDonald,
- He was among the main organizers of Conference of the Depressed Classes at Nagpur on August 8, 1930 presided over by Dr. Ambedkar for **separate electorates for the depressed classes**

- **Elected as  Joint secretary for the federation**
- Fought the assembly elections in 1937 from Nagpur-Kamthi constituency and won
- 1938 –nominated as the president of the CP and Berar branch of ILP.
- fell sick of tuberculosis ( TB ) and his political career came to an abrupt end by his death on January 12,1939.
- He was one of the signatories to the "Poona Pact
- He died young at the age of 35, 12 Jan 1939.

# जयभीमचे जनक एल. एन. हरदास उपेक्षित

## बाबासाहेब म्हणाले होते, 'माझा उजवा हात गेला...' : कामठीत स्मारक उभारावे

**आज स्मृतिदिन**

केवल जीवनतारे :
सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ११ : देशात नव्हे तर जगभरात आंबेडकरी समाज परस्परांना आदराने 'जयभीम' म्हणतो. तो 'जयभीम' शब्द १९३७ साली पहिल्यांदा आमदार बाबू एल. एन. हरदास यांनी उच्चारला. कालांतराने 'जयभीम' आंबेडकरी समाजाच्या क्रांतीचा आरंभबिंदू ठरला. जयभीम ही आंबेडकरी समाजाची ओळखच नव्हे तर 'अस्मिता' बनली आहे. परंतु, 'जयभीम'चे जनक असलेले हरदास यांच्या वाट्याला मात्र उपेक्षाच आली. गेल्या ७७ वर्षांत 'जयभीम' नावाने कामठीत स्मारक उभारता आले नाही, ही



**एल. एन. हरदास**

शोकांतिका. १२ जानेवारी हा हरदास यांचा स्मृतिदिन. हरदास यांच्या मृत्यूची खबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मिळाली असता, माझा उजवा हात गेला अशी प्रतिक्रिया बाबासाहेबांनी दिली होती. असा सच्चा कार्यकर्ता म्हणून हरदास यांची ओळख आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी भदन्त नागदीपंकर गेल्या दीड दशकापासून कार्यरत आहेत. त्यांच्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला त्यांच्याशी साधलेल्या संवादातून हरदास यांचा सारा आयुष्याचा पट त्यांनी उलगडून दाखवला.

हरदास मूळचे कामठीचे. आजही त्यांचे घर...नव्हे तर झोपडी मोडक्या स्थितीत आहे. सहा जानेवारी १९०४ रोजी जन्म झाला. वडील लक्ष्मणराव नगरारे रेल्वेत कारकून होते. 'बाबासाहेब' हे अस्पृश्यांचे नेते म्हणून वृत्तपत्रातून वाचत होते. त्यांनी बाबासाहेबांना नेता मानले. १९२८ साली हरदास आणि बाबासाहेब यांची पहिली भेट झाली. कामठीत झालेल्या दलित परिषदेच्या वेळी मुसळधार पाऊस होता. त्यावेळी स्टेजवरचे सारे पुढारी स्वतःचा बचाव करण्यासाठी निघून गेले. परंतु, हरदास यांनी वादळ संपेपर्यंत 'बाबासाहेबां'ना आधार दिला. दुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे पुढारी 'गांधी की आंबेडकर' असा वाद उपस्थित झाल्यानंतर हरदास यांनी बाबासाहेब हेच अस्पृश्यांचे नेते आहेत अशा आशयाची ३२ 'तार' भारतभर फिरून विविध ठिकाणांहून इंग्रज प्रधानमंत्री यांना पाठवल्या. परिणामी डॉ. आंबेडकर हेच अस्पृश्य समाजाचे नेते असल्याचे सिद्ध झाले.

**आंबेडकरी चळवळीत ३६ वर्षांचा हा आंबेडकरी योद्धा महान पराक्रम करून मृत्यू पावला. परंतु, 'जयभीम' शब्दातून नवीन अध्याय समाजाला दिला. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी १५ जानेवारीला 'कन्हान नदी'च्या काठावरील त्यांच्या समाधिस्थळी 'हरदास मेळावा' भरविण्यात येतो. त्यांचे स्मारक कामठीत उभारण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा.**

- **भन्ते नागदीपंकर,** सल्लागार, समता सैनिक दल, नागपूर.

### मुलाच्या निधनापेक्षा जनसागर मोलाचा

अकोला येथे १९२८ साली दलित परिषदेत हरदास भाषण करीत असताना 'मुलाच्या निधना'ची माहिती मिळाली. परत जाण्यासाठी लोकांनी विनवणी केली. परंतु, माझा एक मुलगा मरण पावला, दुसरा येईल. पण, मी जनसागर सोडून जाणार नाही. समाजासाठी मुलाच्या निधनाच्या बातमीची पर्वा न करणारा कार्यकर्ता 'हरदास' आंबेडकरी समाजाचा सच्चा नेता आहे.

### दुधासाठी पैसे नव्हते...

आंबेडकरी चळवळीसाठी अहोरात्र झुंजणाऱ्या या कार्यकर्त्याला टी. बी.चा आजार झाला. दुधातून गोळी घ्यावी असे डॉक्टरांनी सुचवले होते. ही घटना १९३९ सालची आहे. या लढवय्या आंबेडकरी पुढाऱ्याजवळ आमदार असतानाही दुधाला पैसे नव्हते. हरदास यांची व्यथा त्यांचे जीवलग मित्र धोंडबाजी मेंढे यांच्या लक्षात आली. मेंढे यांची पत्नी नुकतीच बाळंत झाली होती. त्यांनी आपल्या पत्नीचे दूध आणले व हरदास यांना त्या दुधातून गोळी दिली. पुढे मेंढे हे धीरधम्म भन्ते झाले. धीरधम्म भन्ते यांनी सहज बोलता बोलता विनायक जामगडे या कार्यकर्त्याजवळ ही गोष्ट सांगितली होती.

- Lion of Vidarbha . He was native and true son of soil.

JAI BHIM